महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

## अधिष्ठाता(दंत) (Dean-Dental), शासकीय दंत महाविद्यालये व रुग्णालये, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक :९४७(४५)/४४४/दहा**

**जाहिरात क्रमांक : ०७/२०२०**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातर्गत वैदयकीय शिक्षण व संशोधन सेवेतील **शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील अधिष्ठाता(दंत) (Dean-Dental), गट-अ** संवर्गाच्या **एका** पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- १**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.व शै. मागासवर्ग | आ.दु.घ. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | | | - | १ | १ |
| अ) महिला (३०%) | - | - | - | - | - | - | - | - | | | - | - | - |
| ब) खेळाडू (५%) | - | - | - | - | - | - | - | - | | | - | - | - |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** विचाराधीन पदाकरीता वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.- जीडीसी-२००२/१९६७/सीआर-८५/०२/वैसेवा-४, दि. २१.२.२००४ नुसार दिव्यांगांच्या आरक्षणातून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे प्रस्तुत पदाकरिता दिव्यांग प्रवर्गातील उमेदवार अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**३. वेतनश्रेणी** - रु.३७४००- रु.६७०००, ग्रेड पे - रु. १०,०००/- (As per U.G.C. Scale) and (Special Allowance-Rs. ३०००).

**४. पात्रता-**

**४.१** उमेदवार भारतीय नागरिक असावा.

**४.२ वय:- दिनांक १ नोव्हेंबर, २०२० रोजी अमागास उमेदवारांकरिता ५० वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

**४.३.** महाराष्ट्र शासन सेवेत असलेल्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**४.४.**अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोग विचार करु शकेल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. किमान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवार वयोमर्यादेच्या सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव, वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

**४.५ शैक्षणिक अर्हता :-**

**i)** Possess Bachelor Degree of Dental Surgery or an equivalent degree or an equivalent qualification of statutory University or institution recognized by Dental Council of India **And**

**ii)** A Master's or higher degree in Dentistry in any subject of a statutory University or an equivalent post graduate qualification in Dentistry in any subject recognized by Dental Council of India.

**शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या पत्र क्र. एलईसी-४३१८/प्र.क्र.३४१/वैसेवा-४, दि. १६ डिसेंबर, २०१९ अन्वये सदर पदाकरीता पुढील विषयात पदव्युत्तर पदवी धारण करणारे उमेदवार अर्ज करु शकतात.**

**Master's Degree should be possessed in following in subjects:-**

१) कृत्रिमदंतशास्त्र २) दंतशल्यशास्त्र ३) मुखशल्यचिकित्साशास्त्र ४) दंतपरिवेष्टनशास्त्र ५) दंतव्यंगोपचारशास्त्र ६) मुखरोगनिदान व क्ष-किरणशास्त्र ७) दंतविकृतीशास्त्र व अणुजीवशास्त्र ८) बालदंतरोगशास्त्र ९) सामाजिक दंतशास्त्र

**४.६ अनुभव:-Experience in teaching as a Professor in dental college or Medical college for not less than five years acquired after obtaining the qualification mentioned in para (4.5) above**

**४.७ शैक्षणिक अर्हता व अनुभव प्रमाणपत्राबाबत- उमेदवारांनी सदर पदासाठीच्या अर्जात नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या दाव्याच्या अनुषंगाने आयोगाने मागणी केल्यानंतर शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रांच्या प्रती उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. तसेच अनुभव प्रमाणपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' खालील परिशिष्ट.क्र. १४ मधील नमुन्यातील असणे आवश्यक आहे. अनुभव प्रमाणपत्राकरीता उमेदवारांनी "सरळसेवा भरती" उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्र. २.२.१४ चे अवलोकन करावे.**

**५. परिविक्षा कालावधी दोन वर्षांचा राहील.**

**६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून केवळ किमान अर्हता व अनुभव धारण केला म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास, मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षायोजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**७. कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८. शुल्क : १) अमागास उमेदवारांकरिता - रु. ६९९/- २) मागास उमेदवारांकरिता-४२९/-**

**९. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**१०. अर्ज करण्याची पद्धत :-**

**१०.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१०.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २० जुलै, २०२० ते दिनांक १० ऑगस्ट, २०२०** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**१०.३ ऑनलाईन** पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या **https://mahampsc.mahaonline.gov.in** तसेच **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१०.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१०.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएफसी (नागरीक सेवा केंद्र)

**१०.६ www.mahaonline.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in** येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सी.एफ.सी. ची सूची उपलब्ध आहे.

**१०.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर '**Unpaid**' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "**Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

११. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर पदाच्या अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर अथवा चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२. चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१३. चाळणी परीक्षा झाल्यास त्या परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन, तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांआधारे उमेदवाराची शासनास शिफारस करण्यात येईल. तथापि महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यनियमावलीतील नियम ९(ix) नुसार ज्या उमेदवारांना मुलाखतीमध्ये ४१ % व त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचाच शिफारशी करीता विचार केला जाईल.

**१४. अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पूर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारसींकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.**

**१५. सेवाप्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

**१६. मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१७. आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक संपर्क साधने आणण्यास, बाळगण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**

**१८. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१९. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ११ ऑगस्ट, २०२० पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २० जुलै, २०२०**

**उप सचिव (सरळसेवा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**